


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६२४ . वा | सोमवार | दि. ११ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालय प्रशासन माळींवर कारवाईसाठी का कचरत आहे?

# पोलिसांना नाहक विषयामध्ये ओढण्याचा प्रशासनाचा प्रयत्न...

**पोस्टमार्टम ५५**

**जनसंचलन/ बुलढाणा**

प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करून अत्यंत सुरक्षितरित्या सरकारी सेवेतून निघून गेलेले महाभ्रष्टाचारी माजी रोखपाल पी. के. माळी सध्या जिल्हा रुग्णालय प्रशासनाला हवे आहेत. मात्र, माळी हे सातत्याने रुग्णालय प्रशासनाला हुलकावण्या देत आहेत. अशा स्थितीत पोलिस विभागाला नाहक ओढण्याचे काम जिल्हा रुग्णालय प्रशासनाने केल्याचे दिसते. जर खरंच माळी यांच्यावर दबाव आणाणे अनिवार्य आहे, तर त्यांच्या पेंशनसंबंधी कारवाई का केली जात नाही, असा महत्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्हा रुग्णालयाच्या विद्यमान प्रशासन केवळ वेळकाढू धोरण तर अवलंबत नाही ना, अशी शंका आता बळावत चालली आहे. जिल्हा रुग्णालयातील माजी रोखपाल पी. के. माळी यांनी आपल्या कार्यकाळात रुग्णालयाच्या कॅशबुकात मोठ्या प्रमाणात खाडाखोड करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला असल्याचे आता कागदोपत्री पुराव्यांवरून स्पष्ट झालेले आहे. विशेष म्हणजे माळी यांच्या या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक पंडीत व तडस हे देखील बरबटलेले आहेत, हे स्पष्ट आहे. रोखपाल पी.के.माळी हे कॅशबुकात खाडाखोड करीत राहिला आणि त्या भ्रष्टाचाराच्या वर्षावात सर्वच अधिकारी (तत्कालीन विविध जिल्हा शल्यचिकित्सक) देखील चिंब भिजत राहिले. सामुदायिक पद्धतीने झालेल्या या भ्रष्टाचारात तेंव्हा सर्वांनीच आपले खिसे गरम करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. विशेष म्हणजे एव्हढा भ्रष्टाचार करून देखील रोखपाल माळी हे जिल्हा रुग्णालयाच्या कामकाजातून अगदी सुमडीफ्तून निघून गेलेत. येथून त्यांची क्षयरोग रुग्णालयात बदली झाली. तेथून ते सेवानिवृत्त देखील झाले. मुळातच एव्हढा भ्रष्टाचार केलेल्या अधिकाऱ्याला त्याच्या सेवाकाळातील सर्व मड्यूज क्लियर करून देण्यात तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांचा मोठा सिहाचा वाटा आहे. निश्तिच ही बाब देवाण-घेवाण करून झालेली असल्याची दाट शक्यता आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने जेंव्हा जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराचा भंडाफोड सुरू केला, तेंव्हा सर्वच अधिकाऱ्यांची कृष्णकृत्ये उघड झाली.तत्कालीन रोखपाल पी.के.माळी यांनी आपला पदभार सोडताना आपला भ्रष्टाचार बाहेर येऊ नये, यासाठी अनेक कागदपत्रे गहाळ केली. त्यांच्या कार्यकाळातील हिशेबाची अनेक कागदपत्रे आज उपलब्धच दिसून येत नाहीत. त्यांनी विद्यमान रोखपाल लाकडे यांच्याकडे पदभार देताना परिपूर्ण पदभार आणि संपूर्ण माहिती दिलीच नाही. लाकडे नामक महाठग देखील आज स्वतः ला सत्यवादी राजा हरिश्चंद्राच्या वंशावळीतील दाखवण्याचा प्रयत्न करीत असले, तरी त्यांचे देखील हात भ्रष्टाचारात बरबटलेले आहेत, यात काहीच दुमत नाही. कारण लाकडे यांनी पदभार घेताना त्यात अनेक प्रकारच्या त्रुटींकडे जाणुनुजून दुर्लक्ष केले. कदाचित बुहूचर्चित पी.के.माळी यांनी जे काही भ्रष्टाचाराचे श्रीखंड खाल्ले, तीच संधी आता आपल्याला मिळणार असल्याचा भास त्यांना झाला असावा. सिटी न्यूज दैनिक जनसंचलन ने या भ्रष्टाचारासंबंधी माहिती घेण्यास सुरवात केली तेंव्हा लाकडे स्वतः ला अगदीच प्रामाणिक आणि निष्पाप दाखवण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र, लाकडे हे पदभार स्वीकारताना काही अज्ञानी अजिबात नव्हते. त्यांनी तो मुकाटपणे स्वीकारला.जेंव्हा आता हिशेब देण्याची वेळ आली, तेंव्हा लाकडे आता माळींकडे बोट दाखवून रडीचा डाव खेळत आहेत.




**सुज्ञ नागरिकात हा प्रश्न उदभवतो की पी.के.माळी यांनी रोखपाल पदाचा पदभार लाकडे यांना देतांना तो अर्धवट कसा दिला ? दुसरे असे की माळी यांच्या विरोधात जिल्हा सामान्य रुग्णालयात तक्रारी झालेल्या असून त्याची उच्चस्तरीय चौकशी होऊन दिलेल्या अहवालात भ्रष्टाचाराचा आरोप असून व ती माहिती सामान्य रुग्णालयात सर्वांना माहिती असून लाकडे हे त्या वेळेस झोपेत होते का त्यांनी तरीही तो वादग्रस्त रोखपाल व काही काळ भांडारपाल पदभार घेतलाच कसा हा प्रश गटांगळ्या खात आहे. आम्ही जिल्हा सामान्य रुग्णालय करोडो रुपयाच्या भ्रष्टाचार प्रकरणाच्या खोल पर्यंत जाऊन सर्व माहिती गोळा केली असून पुढील प्रत्येक सत्रात पोस्टमार्टम करणारच व जो पर्यंत दोषींना गजाआड करत नाही हे सत्र थांबणार नाही**

उर्वरित पान २ वर

# विकसित भारत संकल्प यात्रेचा उपक्रम राज्यात प्रभावीपणे राबविण्यात यावा- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे...

**वृत्तसंस्था/ नागपूर**

समाजातील सर्वसामान्य घटकांच्या कल्याणासाठी केंद्र शासनाने विविध योजना सुरु केल्या आहेत. त्या लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रा हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या यात्रेच्या माध्यमातून नागरीकांना विविध योजनांचा लाभ मिळणार असल्याने या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी रामगिरी येथे विकसित भारत संकल्प यात्रेच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. त्यावेळी राज्यातील सर्व जिल्हा प्रशासनांना याबाबत विस्ताराने सुचना दिल्या. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्यासह विविध विभागाचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते, पोलीस अधीक्षक सुनील कडासने, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, तहसीलदार माया माने यांच्यासह जिल्हा यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते. केंद्र शासनाच्या अनेक फ्लॅगशिप योजनांपासून अजूनही काही लाभार्थी वंचित आहेत. या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांना योजनांची माहिती व लाभ देण्यासाठी संपूर्ण देशभर हा यात्रेचा उपक्रम राबविली जात आहे. समाजातील सर्वच घटकातील वंचित लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी राबविण्यात येत असलेली ही मोहिम राज्यात प्रभावीपणे राबवा. जास्तीत जास्त लाभार्थ्यांना उपक्रम काळात लाभ देण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात हा उपक्रम अधिक चांगल्या पद्धतीने कसा राबविता येईल, याकडे लक्ष दिले पाहिजे. यात्रेचा जनजागृती रथ गावांमध्ये जात असतांना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याठिकाणी उपस्थित राहून आपल्या योजना गावकऱ्यांना समजावून सांगितल्या पाहिजे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात आघाडीवर राहील, यासाठी ग्राम स्तरावर काम करणाऱ्या सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक पात्र लाभार्थ्यांस या उपक्रम कालावधीत विविध योजनांचा लाभ मिळाला पाहिजे, असे सांगितले. उपक्रमाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र आघाडीवर असला पाहिजे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हा उपक्रम अतिशय महत्वाचा ठरणार आहे, असे उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील हा उपक्रम राज्यात प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना केल्या.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## विवेकानंद आश्रमात प. पू. शुकदास महाराजांचा जयंती सोहळा...

# मोफत आरोग्य शिबिर विज्ञान प्रदर्शन वक्तृत्व गायन स्पर्धा व प्रवचन...

**जनसंचलन/हिवरा आश्रम**

विवेकानंद आश्रमात कार्तिक वद्य त्रयोदशी सोमवार ११ डिसेंबरला आश्रमाचे संस्थापक निष्काम कर्मयोगी संत प. पू. शुकदास महाराजांचा जयंती सोहळा अत्यंत भक्तीभावाने व विविध सेवा उपक्रमांव्दारे संपन्न होत आहे. स्वामी विवेकानंदांचे तत्त्वाज्ञानाच्या पातळीवर असलेले जीवन विषयक विचार माणसाच्या व्यवहारीक जीवनात त्याला सुख आणि आनंद मिळवून देण्यासाठी प्रॅक्टीकल वेदांतरूपाने महाराजांनी अंगिकारले. माणसातच देव आहे व मी त्या देवाचा भक्त आहे. त्याची पूजा ही परमेश्वराची पूजा आहे. हा स्वामी विवेकानंदांचा उच्चत्तम विचार जीवनाचे मिशन बनून सर्वसामान्यांसाठी विवेकानंद आश्रम या धर्मदाय स्थापना शुकदास संस्थेची करणारे महाराज यांच्या कर्मप्रधान व सेवाप्रधान कर्तृत्वाने असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान बनले आहेत. त्यांनी स्थापन केलेला विवेकानंद आश्रम लक्षावधी तरूणांना शिक्षण, स्वावलंबन व संस्काराचे केंद्र बनला आहे. स्त्री-पुरुष भेदाचा कुबट दुर्गंध येथे नसून आत्मसन्मानाने निर्भय वातावरणात शिक्षण घेत असलेल्या हजारो मुलींसाठी ही संस्था विद्या नगरी बनली आहे. दीनदुखी, वंचित पिडीतांसाठी सेवेसाठी देह झिजविणाऱ्या महाराजांच्या जयंती निमित्ताचे औचित्य साधून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, अस्थिरोगतज्ञ, नेत्रतज्ञ, दंततज्ञ, मानसोपचारतज्ञ, शल्यचिकित्सक इत्यादी तज्ञ डॉक्टर मोफत सेवा देणार आहेत. शिक्षण विभागाच्या वतीने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजनही यानिमित्त करण्यात आले आहे. विवेकानंद आश्रम हा अध्यात्मासोबत विज्ञानवादाचा पुरस्कार करणारी डोळस सामाजिक संस्था आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनात बालपणापासूनच विज्ञान विषयक दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी



दरवर्षी विज्ञान प्रदर्शनी भरविल्या जाते. जिल्हास्तरीय शालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले आहे. आरोग्यम धनसंपदा या विषयावर विद्यार्थी वक्ते आपले विचार व्यक्त करणार आहेत. शालेय क्रिडा स्पर्धा भक्तीगीत गायन व प्रवचन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. या सोहळयासाठी राज्यभरातून असंख्य भाविक आश्रमात येत असतात. त्यांच्या व्यवस्थेसाठी नियोजन करण्यात आले आहे. भाविकांनी व गावकऱ्यांनी दर्शन, प्रवचनासह आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पान १ वरून जिल्हा रुग्णालय प्रशासन माळींवर...

हाच डाव पुढे रेटण्यासाठी मग विद्यमान जिल्हा रुग्णालय प्रशासनाने पोलिस विभागाला यात नाहक खेचण्याचा प्रयत्न केला. शहर पोलिस स्टेशनला रुग्णालय प्रशासनाने पत्र देऊन माळी यांना हजर करण्यास विनंती केली. परंतु मुळात आज माळी यांच्यावर रुग्णालय प्रशासनाने कोणतीही एफआयआर केली नाही. मग माळी यांना हजर करण्यास रुग्णालय प्रशासन कोणत्या तोंडाने सांगत आहे, हा खरा प्रश्न आहे.वारंवार सांगून देखील माळी जर रुग्णालयात हिशेब देण्यासाठी हजर होत नसतील, तर एक बाब सिद्ध आहे की, माळी यांनी प्रचंड भ्रष्टाचार केलेला आहे. तसेच अपूर्ण पदभारामुळे आज लाकडे हे अडचणीत आलेले आहेत. या स्थितीत माळी यांच्यावर भ्रष्टाचार प्रकरणी लाकडे स्वतः वरिष्ठ अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून एफआयआर दाखल करण्यासाठी पुढाकार का घेत नाहीत. लाकडे हे जाणुन बुजून विद्यमान जिल्हा शल्यचिकित्सकांच्या कोर्टात चेंडू टाकून त्यांच्यावर जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न तर करीत नाहीत ना, अशी शंका आता यायला लागली आहे. हा वाद मुळात माळी व लाकडे यांच्यातील आहे. या स्थितीत लाकडे महाशय स्वतःला नामानिराळे ठेवण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सकांनी खरे तर यात आता पुढाकार घेऊन या दोघांनाही एका ठिकाणी आणणे गरजेचे आहे. तिकडे माळी एव्हढा भ्रष्टाचार करून हात पुसून निघून गेलेले आहेत. आज सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन देखील घेतात.जर ते रुग्णालय प्रशासनाला सहकार्य करीत नाहीत, तर त्यांची त्वरित पेंशन थांबवण्यासंबंधी कारवाई का करीत नाही, असे अनेक प्रश्न आज निर्माण झाले आहेत. जिल्हा रुग्णालय प्रशासन या प्रकरणी कितीही ढिसाळपणा करीत असले, तरी भ्रष्टाचार विरोधातील आपली कणखर भूमिका घेऊन दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज हे प्रकरण तडीस लावल्याशिवाय व भ्रष्टाचाऱ्यांना गजाआड केल्याशिवाय शांत बसणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

# समता संघटनेचा हिवाळी अधिवेशनावर मोर्चा...

**जनसंचलन/बुलढाणा**



भूमिहीनांनी शेती प्रयोजनार्थ बऱ्याच कालावधीपासून केलेले अतिक्रमण नियमानुकूल करणे यासह आदी विविध मागण्यांसाठी समता संघटनेच्यावतीने १९ डिसेंबर रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनावर मोर्चा काढता येणार आहे. तसे निवेदन संघटनेच्यवतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. भूमीहीन, शेतमजूर, अनुसूचित जाती जमाती, भटके विमुक्त अन्य मागास प्रवर्गातील व आर्थिक दृष्ट्या दुर्बल लोकांनी गायरान कसणाऱ्यांची आजपर्यंत केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करून मालकी हक्काची पट्टे वाटप करण्यात यावे, वनहक्क कायद्यातंर्गत प्रलंबित दाव्यावर निर्णय घेऊन तात्काळ पट्टेवाटप करण्यात यावे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहीनी प्रकल्प वहीतीखालील असलेल्या गायरानावर न घेता इतर पड जमिनीवर घेण्यात यावा, यासाठी झालेले आदेश रद्द करण्याच्या मागण्याठी समता संघटनेचे नागपूर हिवाळी अधिवेशनावर १९ डिसेंबर रोजी अधिवेशनात शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय घेण्यासाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर समता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नितीनभाऊ गवई, जिल्हाध्यक्ष अरुण भालेराव, विजय दोडे, गजानन जाधव यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ करण्यासाठी अधिवक्ता परिषदेचे योगदान महत्वाचे- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**जनसंचलन/बुलडाणा**

सामान्य माणसाचा विश्वास न्यायव्यवस्थेवर आहे, तोपर्यंत लोकशाहीला धोका नाही. जनसामान्यांच्या मनातील न्यायव्यवस्थेवरचा विश्वास दृढ करण्यासाठी व न्यायव्यवस्थेचे पावित्र्य जपण्यासाठी अधिवक्ता परिषदेने योगदान द्यावे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृह, विधी व न्याय मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज शेगाव येथे केले. अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेतर्फे शेगाव येथील श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित विदर्भ प्रदेश अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. परिषदेचे राष्ट्रीय महामंत्री डी. भरतकुमार, महाराष्ट्र-गोवा प्रदेश अध्यक्ष पारिजात पांडे, विदर्भ प्रदेश अध्यक्ष दत्ताजी डुबे, भूषण काळे, नीलिमा जोशी आदी व्यासपीठावर, तसेच आमदार सर्वश्री प्रसाद लाड, डॉ. संजय कुटे, आकाश फुंडकर आणि आमदार श्वेता महाले सभागृहात उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, सर्वात प्राचीन लोकशाही भारतात असल्याचे दाखले इतिहासात सापडतात. देशात कायद्याने चालणारा समाज प्राचीन काळापासून आहे. भारतीय संविधान श्रेष्ठ आहे. जगातील सर्वोत्तम संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले. आपल्या सामाजिक,आर्थिक प्रगतीची दिशा त्यातून मिळते. भारतात नि:पक्षपाती व निर्भय वातावरणात निवडणूका होतात. इथली समाजव्यवस्था न्यायाधिष्ठित आहे.सामान्य माणसांचा लोकशाहीवर विश्वास आहे. हा विश्वास व न्यायव्यवस्थेचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी अधिवक्ता संघटनेवर आहे. राष्ट्र प्रथम या भावनेने हे कार्य केल्यास देश कधीच गुलामीत जाणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, न्यायव्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर होणे आवश्यक असून, न्यायव्यवस्थेचे कामकाज ऑनलाईन होत आहे. कोविड काळात ऑनलाइन पद्धतीने कोर्ट चालवण्यात आले. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे न्यायव्यवस्थेत चांगले बदल होणार आहेत, असे सांगून ते म्हणाले की, ब्रिटिशांच्या वसाहतवादी दृष्टीतून भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता या कायद्यांची रचना झाली. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानंतर ते बदलणे आवश्यक आहे. आपल्याला



कायदा आणि सुव्यवस्था, समाज सुरक्षित ठेवण्यासाठी व सामान्य माणसाला न्याय मिळण्यासाठी कायदा बदलण्याची गरज आहे. या प्रक्रियेत अधिवक्ता परिषदेनेही योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्याय क्षेत्रातील पाच लाखांपर्यंतची मर्यादा वाढविण्याच्या मागणीचा नक्कीच विचार करण्यात येईल. त्याचप्रमाणे, अधिवक्त्यांसाठी मुंबईत प्रशिक्षण संस्था निर्माण करण्यासाठी निश्चितपणे जागा उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. न्यायदानाची पद्धत सुधारण्यासाठी अधिवक्ता परिषदेने सूचना द्याव्यात त्याचाही विचार करु, असेही त्यांनी सांगितले. राष्ट्रगीताने परिषदेचा समारोप झाला.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाण्यातील महिला परिषद ठरली चिंतन परिषद- विविध ठरावही झाले पारीत...

## सामाजिक बांधिलकीतून उतराई होण्याचा प्रयत्न करूया -डॉक्टर शिंगणे...

## एकल महिलांसाठीच्या योजनांचा लाभ घ्या-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

आयुष्यात काय कराव याचे उत्तर अनेकदा मिळत नाही. मात्र इतरांचे संसार उभे करणारी आजची विधवा परिषद महिलांसाठी आशेचा किरण ठरली आहे. विधवांच्या समस्या आहेत मान्य आहे.. मात्र समस्यांना घाबरून जाऊ नका. धैर्याने पुढे या. तुम्ही एकट्या नाही आम्ही आपल्या सोबत आहोत. असा आशावाद डॉक्टर राजेंद्र शिंगणे यांनी महिला परिषदेत व्यक्त केला. शिवसाई परिवाराचे प्रा. डी एस लहाने यांच्या संकल्पनेतून मानस फाउंडेशनच्या पुढाकाराणे तुलसी नगर येथे आज १० डिसेंबर रोजी ऐतिहासिक अशी महिला परिषद पार पडली. परिषदेचे अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील होते. तर उद्घाटक म्हणून माजी मंत्री डॉक्टर राजेंद्र शिंगणे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या इंदूमती लहाने, डॉक्टर वसंतराव चिंचोले, श्रीमती पांडे आजी, पत्रकार गणेश निकम केळवदकर, प्राचार्य शाहीना पठाण, जिजाताई चांदेकर, प्रतिभा भुतेकर, साहित्यिक सुरेश साबळे, माधवराव हुडेकर, डॉक्टर शोण चिंचोले, सुनील सपकाळ, डॉक्टर मनोहर तुपकर, प्रा. राम बारोटे,अमोल रिंढे,प्रशांत वाघोदे, मनोज दांडगे, राजेंद्र काळे,लक्ष्मीकांत बगाडे,दीपक मोरे, डॉक्टर गायत्री सावजी निर्मला तायडे, जयश्री बोराडे, अश्विनी सोनवणे आदींची उपस्थिती लाभली. पुढे बोलताना डॉ. राजेंद्र शिंगणे म्हणाले- एकेकाळी महिलांचा पती वारल्यानंतर ती महिला सती जायांची. शंभर टक्के पुरुशी वर्चस्व समाजात राहिले. अमर्याद अधिकाराने महिलांना अनंत अडचणी आल्या समाजधुरीणांनी वेळोवेळी बदल केले असे असले तरी २१ व्या शतकात देखील विधवा महिलांच्या समस्या संपल्या असे नाही. विशेषतः विधवांना आजही बंधनात राहावे लागते. मात्र बंधने जाचक आहेत ती झुगारलीच पाहिजे. ज्या महिलांनी बंधने झुगारली त्यांनी प्रगती साधली. आयुष्यात काय करावे याचे उत्तर बऱ्याच जणांना मिळत नाही. इतरांचे संसार उभे करण्याची प्राध्यापक डी एस लहाने यांची धडपड पाहता त्यांना याचे उत्तर मिळाले आहे.असे कौतुकोद्गार काढून डॉक्टर शिंगणे यांनी आजची महिला परिषद राज्याच्या इतिहासात ऐतिहासिक ठरणार असल्याचे सांगितले.

आपण एकटे आहोत आपल्यासाठी कोणीतरी येईल व आपल्या समस्या सोडविल अशी आस बाळगू नका. मानसिक बदल स्वीकारा, याची सुरुवात स्वतःपासून करा. सक्षमपणे उभे रहा आणि वाटचाल करा, आपण भूतकाळ बदलू शकत नसलो तरी भविष्यकाळ आपल्या हातात आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील यांनी केले. यावेळी डॉक्टर किरण पाटील यांनी जिजाऊ सारखे खंबीर होण्याचे आवाहन उपस्थित विधवा महिलांना केले. शिवरायांना पितृछत्र मिळाले नाही, त्यांना मातृछत्र मिळाले, त्याकाळी जिजाऊ सती गेल्या नाहीत तर त्यांनी शिवाजी महाराजांसारखा राजा घडविला एवढेच नव्हे तर विधवा असणाऱ्या जिजाऊ राज्याभिषेकालाही उपस्थित राहिल्या हा आदर्श आपण घ्यावा असे सांगून त्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.




श्रीमुक्ती संघटनेच्या जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या इंदूमती लहाने यांनी मानवतावादी उपेक्षित वर्गाला न्याय देणारी परिषदा असल्याचे सांगितले. उपेक्षित महिलांसाठी पुरुषांनी पुढाकार घेतल्याचे पाहून समाधान वाटले असे सांगून त्यांनी तू मला काय टाकतोस- मीच कात टाकते असा जोश भरला. वर्धक्यातही श्रीमुक्तीचा हुंकार तेवढ्याच ताकतीने मांडून त्यांनी उपस्थितांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला.







प्रास्ताविक डीएस लहाने यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी आयोजना मागची भूमिका मांडली महिला. महिला विधवा झाली की तिला करंट्या पायाची म्हटले जाते. जी मुलगी लक्ष्मीच्या रूपांनी तुमच्या घरात येते ती करंट्या कपाळाची कशी होते? असा प्रश्न उपस्थित करून लहाने यांनी विधवांच्या समस्यांना हात घातला. सामाजिक बदल,विधवांच्या समस्या सोडवून त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.विधवा महिला परिषद कशासाठी? या परिषदेचा उद्देश स्पस्ट करणाऱ्या ठरावांचे वाचन परिषदेच्या उद्घाटनाचा सत्रात करण्यात आले. पत्रकार गणेश निकम केळवदकर यांनी ठराव वाचन केले तर त्याला उपस्थित भगिनींनी व पुरुषांनी हात उंचावून दाद दिली. विधवा घटस्फोटीत महिलांना सन्मान जनक स्थान मिळावे यासाठी पुढाकार घेणे, विधवा महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे, शासनाने त्याचा कृती आराखडा तयार करावा, विधवा पुनर्विवाह साठी कायद्याने अनुदान द्यावे, वारसा हक्काने मिळणारे अधिकार विधवा महिलेस द्यावे अशे वेगवेगळे ठराव घेण्यात आले. सुचक गणेश निकम, प्राचार्य शाहिना पठाण, प्रतिभा भुतेकर, प्राचार्य ज्योती पाटील होते. तर साहित्यिक सुरेश साबळे, निर्मला तायडे, जयश्री बोराडे, अश्विनी सोनवणे मनीषा वारे यांनी अनुमोदन दिले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रतिभा भूतेकर यांनी केले.

---

## आ. धिरज लिंगाडे यांची विधान परिषद सभापती तालिकेवर नियुक्ती...

## बुलढाणा जिल्ह्याचा गौरव...



जनसंचलन/बुलढाणा

अधिवेशन २०२३ करिता विधान परिषद सभापती तालिकेवर अमरावती पदवीधर मतदार संघाचे लोकप्रिय आमदार श्री धिरज रामभाऊ लिंगाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आमदार धिरज लिंगाडे यांच्या पहिल्याच टर्मच्या दोन्ही अधिवेशनातील उल्लेखनीय व अभ्यासपूर्ण कामकाजामुळे काँग्रेस पक्षाने ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे. धिरज लिंगाडे यांच्यावर हि महत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.पाच जिल्ह्याचे हे आमदार आहे. महाराष्ट्र विधानमंडळ काँग्रेस पक्ष नेते बाळासाहेब थोरात यांनी मा. प्रधान सचिव वर्ग (१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन नागपूर यांना पत्राद्वारे आमदार धिरज लिंगाडे यांचे नामनिर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने विधान परिषद सभापती व उपसभापती यांनी आमदार धिरज लिंगाडे यांची विधान परिषद सभापती तालिकेवर नियुक्ती केली आहे. ही घोषणा विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोहे यांनी विधान परिषदेत केली.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

जनसंचलन/ शेगाव

लग्नाचे आमिष दाखवून एका युवकाने १६ वर्षीय अल्पवयीन मुलीशी वारंवार शारिरीक संबंध प्रस्थापित करून तिला गर्भवती केल्याची घटना उघडकीस आली आहे. पिडीत मुलगी ४ महिन्यांची गर्भवती असून याप्रकरणी तिच्या तक्रारीवरून पेलिसांनी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शहरातील एका १६ वर्षीय मुलीशी पिंपळगाव राजा येथील याचे सुत जुळले होते. त्याने लग्नाचे आमिष दाखवून सदर मुलीशी वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यामुळे पिडीत मुलीला गर्भधारणा झाली. सध्या ती ४ महिन्यांची गर्भवती आहे. एका



खासगी डॉक्टरकडे तपासणी केली असता हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. याबाबत पिडीत मुलीने शहर पोलिसांत तक्रार दिली असून तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी अरबाज खान आबीदउल्ला खान याच्या विरुध्द भादंवि कलम ३७६, ३७६ (२) (प), सहकलम ३,४ पोस्को कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पीएसआय सविता कुवारे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे

# देवेंद्र फडणवीस यांच्यावर हक्कभंग दाखल करा, डॉ. संजय लाखेपाटलांची मागणी...



वृत्तसंस्था/ जालना

गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सवयीप्रमाणे धांदात खोटे बोलून अंतरवाली सराटी लाठीमार, अश्रूधूर, गोळीबार प्रकरणी सभागृहाची आणि राज्याची दिशाभूल केली, खरी माहिती लपवली आहे. यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हक्क भंग दाखल करण्याची मागणी मराठा क्रांती मोर्चा आणि सकल मराठा समाजाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील पाटील यांनी ईमेलद्वारे राहुल नार्वेकर आणि दोन्ही विरोधी पक्षनेते यांच्याकडे केली आहे. अंतरवाली सराटी ग्रामस्थांवरील अमानुष लाठीमार अश्रूधूर, गोळीबार प्रकरणी निष्पक्ष चौकशी करून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही जबाबदारी निश्चित करावी. डॉ. संजय लाखेपाटील यांची लोकायुक्त आणि राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार देखील केली आहे. अंतरवाली सराटी येथील धार्मिक पठण, हरीनाम गजरात दंग असलेल्या ग्रामस्थ आंदोलकांवर केलेल्या अमानुष पोलीसी लाठीमार, जबरी अश्रूधूर नळकांडे फोडाफोडी आणि बेरहम गोळीबार प्रकरणी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सभागृहात सांगितलेली माहिती ही खोटी आणि सभागृहासह राज्यातील जनतेची दिशाभूल करणारी असून त्यांनी पाशवी अश्रूधूर आणि गोळीबारात जखमींची आणि दोन आंदोलकांच्या शरीरात अमानुष गोळीबारनंतर अद्यापही असलेले छर्रेर्फ यांची माहिती लपवली असून सभागृहाची दिशाभूल केली आहे.त्याबद्दल त्यांच्या विरोधात हक्कभंग दाखल केला पाहिजे. अशी मागणी डॉ संजय लाखेपाटील यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, दोन्ही विरोधी पक्षनेते यांना केली असून या प्रकरणात निष्पक्ष चौकशी होऊन निष्पाप ग्रामस्थांना न्याय मिळण्यासाठी लोकायुक्त आणि राज्य मानवी हक्क आयोगाकडे वेगवेगळ्या तक्रारी दाखल करून न्यायासाठी मागणी केली आहे. सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात मुंबईत सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडवण्यापुर्वी निष्पाप आंदोलकांविरोधात दाखल गुन्हे तातडीने परत घ्यावेत त्याशिवाय ग्रामस्थ ऊपोषण परत घेणार नाहीत, अशी आग्रही भूमिका मी स्वतः ना. अशोकराव चव्हाण साहेबांचा प्रतिनिधी म्हणून बैठकीला उपस्थित राहून मांडली होती. या भूमिकेला छगन भुजबळासह दोन्ही विरोधी पक्षनेते आणि राज्यातील सर्व राजकीय पक्षाचे उपस्थित सर्वपक्षीय नेतेमंडळींनी एकमताने पाठींबा दिला. यानंतर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी सगळ्यांचे गुन्हे परत घेण्यासाठी मान्यता देऊन तशी घोषणा सर्वपक्षीय बैठक संपल्यानंतर जाहीर पत्रकार परिषदेत करून गुन्हे मागे घेतल्याचा निर्णय झाल्याचे स्पष्ट केले होते. तसे त्या पत्रकार परिषदेचे सर्व ऑडीओ/व्हिडिओ रेकॉर्डींग समाजमाध्यमात उपलब्ध असून वर्तमानपत्रात ही बातम्या असून सदर बैठकीच्या ईवृत्तात तशी नोंद झालेली आहे. . ती सार्वजनिक आहे. पोलिसांच्या अमानुष लाठीमार, वयोवृद्ध महिलांनाही पुरूष पोलिसांची जखमी होईपर्यंत दंडुक्याने मारहाण,अश्रूधूर आणि गोळीबार याने पश्चात्तापदग्ध होऊन माफी मागतानाचे देवेंद्र फडणवीस राज्यासह सगळ्या देशाने पाहिले आहेत. मग फडणवीस यांची ती माफी हे मगरीचे अश्रू होते कि स्टॅटेजीक माफी ढोंग होते याचाही खुलासा लबाड शिंदे-फडणवीस-पवार सरकारने किंवा स्वतः ना. एकनाथराव शिंदे यांनी करावा अशीही मागणी डॉ. संजय लाखेपाटील यांनी केली आहे. ग्रामस्थांनी आधी नाहक दगडफेक चालू केली. पोलिसांवर हल्ला केला असे गृहमंत्री फडणवीस यांना म्हणायचं आहे का? आणि तसे धांदात खोटे विधानसभेच्या पटलावरील ऊत्तराद्वारे प्रस्थापित करायचे आहे का? आणि तसे असेल तर हा निष्पाप ग्रामस्थांशी अक्षम्य गुन्हा आहे हे नक्की! याचाही खुलासा ना एकनाथराव शिंदे यांनी करणे आवश्यक आहे.अशा प्रकारचा शरीरावर केलेला बेछूट गोळीबार, त्यातील दोन ग्रामस्थांच्या शरीरात आजही असलेले आणि सर्व वैद्यकीय उपचारानंतर ही न निघालेले बंदुकीच्या गोळ्या/छर्रे तसेच पोलिसांनी आधी अमानुष लाठीमार चालू केला. ज्याचे फुटेज ऊपलब्ध आहेत. त्याची आणि यातील सहभागी वरिष्ठ पोलीस, गृहमंत्री/गृहखाते यांची नेमकी भुमिकेची आणि कॉल रेकोर्ड, सीडीआरची तपासणी करुन ग्रामस्थावरील अमानुषतेची चौकशी करण्यासाठी राज्याचे लोकायुक्त आणि राज्य मानवी हक्क आयोग यांनी तातडीने दखल घेऊन चौकशी करावी यासाठी डॉ. संजय लाखेपाटील यांनी त्यांच्याकडे रितसर तक्रार दाखल केली आहे

# कुणबी नोंदी काही अधिकारी दडवून ठेवत आहेत...

## कामचुकार अधिकाऱ्यांना निलंबित करा मनोज जरांगे पाटील यांचा इशारा

वृत्तसंस्था/लातूर

मराठा समाजाच्या कुणबी नोंदी असूनही काही अधिकारी नोंदी जाणूनबुजून दडवून ठेवत आहेत. अशा कामचुकार अधिकाऱ्यांना निलंबित करा. मराठ्यांचे वाटोळे करणारे अधिकारी नोंदी शोधण्याच्या कामात नको. अधिकाऱ्यांनी जातीयवाद न करता आपली जबाबदारी पार पाडावी. तुम्ही कुणबी नोंदी बुडाखाली लपवून ठेवणार असाल तर ते सहन करणार नाही, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर सभेत दिला. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांची शनिवारी दुपारी जांब, जळकोट (जि. लातूर) येथे सभा झाली. जरांगे यांनी आरक्षण प्रक्रियेच्या सद्यस्थितीवर सडेतोड भाष्य केले. ङ्गआतापर्यंत ३५ लाख मराठ्यांना आरक्षण मिळाले, ही एकजुटीची ताकद आहे. नोंदी सापडलेल्या नागरिकांना ताबडतोब प्रमाणपत्र देण्याचे काम सरकारने सुरू केले आहे. ङ्गछत्रपती संभाजीनगर, लातूर आणि नांदेड जिल्ह्यात कमी नोंदी मिळाल्या आहेत. नोंदी शोधण्यासाठी उर्दू, मोडी, फार्सी लिपीचे अभ्यासक दिले आहेत. कंधार भागात साडेचार हजार नोंदी तपासून अधिकाऱ्यांनी निरंक अहवाल दिला. त्या भागातील नागरिकांनी अभ्यासक आणून त्या नोंदी तपासल्या तर शेकडो नोंदी सापडल्या आहेत. मग अधिकाऱ्यांनी हा खोडसाळपणा का केला ? अधिकारी देशाचा कणा असून त्याला जात नसते. सामाजिक न्यायाची त्याची भूमिका असावी, असे जरांगे म्हणाले.राज्य सरकारने नोंदी शोधण्यासाठी कर्मचाऱ्यांचे संख्याबळ आणि अभ्यासक वाढवले आहेत. अधिवेशनाचा काळ असला तरी सरकारने नोंदी शोधण्याच्या कामासाठी वेळ द्यावा. येत्या २४ डिसेंबरला दुसरा अहवाल स्वीकारून मराठा समाजाला आरक्षण देऊन सरकारला आपला शब्द पूर्ण करायचा आहे. कुणी अधिकारी कामचुकारपणा करणार असतील तर त्यांना हटवा. ३५ लाख नोंदीचा आधार घेऊन कायदा पारित करावा आणि मराठ्यांचा ओबीसीत समावेश करावा.



अन्यथा, पुढचे आंदोलन सरकारला जड जाईल, असे जरांगे म्हणाले.मराठा समाजाचा नोकरीतील टक्का कमी झाला आहे. त्यासाठी आरक्षण आवश्यक असून जनजागृतीसाठी गावे आणि घरे पिंजून काढा, असे आवाहन जरांगे यांनी केले. जिजाऊ वंदनेने सभेला सुरुवात झाली. या सभेला हजारो नागरिक उपस्थित होते. शांततेच्या आंदोलनात मोठी ताकद असते. शांतीचे ब्रह्मास्त्र पेलण्याची ताकद देश आणि राज्यात कुणाकडे नाही. गेल्या ७० वर्षांत पहिल्यांदाच मराठा आरक्षण निर्णय प्रक्रियेत आले. अर्धे मंत्रिमंडळ मराठा आरक्षण विषयावर काम करीत आहे. जर सरकारने आरक्षण नाही दिले तर समाजाने शांततेत आंदोलन करावे, असे जरांगे म्हणाले.

# उदयनगर येथे २ घरे फोडून दीड लाखाचा ऐवज लंपास...

जनसंचलन/ चिखली

उदयनगर येथे गेल्या १५ दिवसांपासून चोरीच्या घटना सुरूच असून अज्ञात चोरट्यांनी पुन्हा गिरीश कलंत्री व दायमा यांचे घर फोडून जवळपास दीड लाखाचा ऐवज लंपास केला सदर घटना ९ डिसेंबर रोजी सकाळी उघडकीस आली असून अमडापुर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. येथील मारवाडी गल्लीतील बाहेरून कुलूप लावलेली बंद असलेली घरे चोरट्यांनी टार्गेट करून फोडले यामध्ये गिरीश कलंत्री यांचे घर अज्ञात चोरट्याने कुलूप तोडून घरात प्रवेश करीत कपाट फोडले यामधील चांदीचा लोटा वजन ३०० ग्राम किं. २४००० हजार रुपये, चांदीचे २ ग्लास वजन ३८० ग्रॅम २२००० व इतर अधिक रोख ४० हजार रुपये असे १ लाख ०२ हजार रुपयांचा ऐवज तर दायमा यांचे घर अज्ञात चोरट्यांनी कुलूप फोडून आत प्रवेश करीत कपाट फोडून त्यातील सोन्याचे मनी २० नग, टाप्स, पायातील चैन पट्टी, जोडवे असे एकूण १ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला या सोबतच अधिक इतरही दोन-तीन घरे फोडल्याची माहिती आहे याबाबतची लेखी फिर्याद गिरीश शामलाल कलंत्री वय ४२ वर्ष रा. उदयनगर यांनी अमडापुर पोलीस स्टेशनला दिल्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध अप. क्रमांक ०३८६ / २०२३ भा. द. वि. कलम ४५७, ३८० नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास अमडापुर पोलीस करीत आहे. तर घटनास्थळी श्वानला ही पाचारण करण्यात आले होते. सदर श्वान ने गिरीश कलंत्री यांचे घर नंतर ढोले, टेकाळे, दायमा यांचे घरानंतर माऊली नगर कडे मार्ग दाखविला तर ठसे तज्ञांनाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले होते. उदयनगर येथे गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटना सुरु असून स्टेट बँकेतून दिवसाढवळ्या ७८ वर्षे वृद्ध महिलेची पिशवी कापून ३० हजार रुपये लंपास केले नंतर पुन्हा दोन घरे फोडली होती. तर पुन्हा चोरीच्या घटना सुरूच असल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून गजानन महाराज मंदिर परिसरातील काही युवकांकडून रात्रीचे जागरण सुद्धा करण्यात येत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | Rates | Height | Width |
|---|---|---|---|
| 8x8 cm | 1 Month=5000/-<br>15 Day=3500/-<br>7 Day=2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

**एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

| Rate | Height | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्कः
अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com